# केशवाच्या नीतीमतेने गोरगरीब ठेविदारांच्या आयुष्याची केली माती, प्रदीप दीक्षित सारखा ठेवीदार अखेर भिडलाच?

## दैनिक महाराष्ट्र आरंभचा अखेर अंदाज खरा ठरला


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564






■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २५९ ■ शनिवार दि.७ जून २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रु. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 259 ■ Saturday Dt.7 June 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4


# शेवटी गेवराईतील श्री मंगलनाथ मल्टिपल निधी बँक पडली बंद; चेअरमन केशव पंडित यांच्या विरोधात तक्रार दाखल


## संपर्कात असणाऱ्या पती-पत्नीच्या आधी मुसक्या आवळून गोरगरीब ठेवीदारांचे पैसे परत करा?

गेवराई । प्रतिनिधी

गेल्या अनेक दिवसापासून दिवसेंदिवस वाढत असलेल्या बँकिंग क्षेत्राच्या मनमानी कारभाराला सामान्य नागरिक कंटाळले आहेत. खाजगी बँका सर्वसामान्य खातेदारांचे पैसे बुडवत असल्याचे पाहायला मिळते बँकांची आर्थिक व्यवहारातून मोठी अडचण निर्माण झाली आहे. सर्वसामान्य ठेवीदारांनी आपल्या गरजा भागवण्यासाठी आणि अडचणीत याच पैशाचा सहारा भविष्यात आपल्याला मिळेल यासाठी एक एक रुपया जमा करून त्यांनी आपल्या आयुष्याची पुंजी त्या शाखेत जमा केलेली आहे. गेवराई शहरातील छत्रपती मल्टीस्टेट, गोदावरी मल्टीस्टेट, आईसाहेब महिला अर्बन, बँक बंद पडण्याच्या मार्गावर आहेतच या नावाची चर्चा असताना अशातच आता श्री मंगलनाथ मल्टिपल निधी शाखेचा चेअरमन केशव पंडित हा शाखेला कुलूप लावून फरार आहे याबाबत एकाच एका ठेविदाराने गंभीर आरोप करत दहा लाख रुपयांच्या फसवणुकी प्रकरणी गेवराई पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केले आहे.

तसेच याबाबत मागील काही दिवसांपूर्वी दैनिक महाराष्ट्र आरंभने बातमी प्रकाशित करून या प्रकरणी आवाज उठवला होता दोन एप्रिल रोजी याप्रकरणी अजितदादा गेवराई येथे खाजगी बँकेचा लावणारा चेअरमन वेढ्याचे सोंग घेऊन हॉस्पिटलमध्ये दाखल झाला या मातळ्याखाली आडे मुद्दा क्रॉस या माध्यमातून रोखठोक लिखाण केले होतें आणि अखेर आज त्या बातमीचा अंदाज खरा ठरला आणि संबंधित चेअरमन केशव शेषनारायण पंडित यांच्या विरोधात गेवराई पोलीस ठाण्यात तक्रार दाखल झाली. गेवराई येथील श्री मंगलनाथ मल्टिपल निधी या संस्थाचालकाने आपल्या स्वत:च्या फायद्यासाठी लोकांना अडचणीत आणण्याचा डाव मेंटल असल्याचे सोंग करून साधण्याचा प्रयत्न केला मात्र तो एका पट्ट्याने हानुन पाडला.




गेवराईतील श्री मंगलनाथ मल्टिपल निधी बँक एक महिन्यापासून बंद ?

गेवराई शहरात कुलकर्णी प्लाझा येथे असलेल्या श्री. मंगलनाथ मल्टिपल निधी अर्बन हि बँक एक महिन्यापासून बंद असून, चेअरमन केशव शेषनारायण पंडित हे गेल्या अनेक दिवसांपासून आजारी असल्याचे कारण दाखवून फरार आहेत. यामुळे खातेदार व ठेवीदार चिंतेत आहेत. खातेदारांची रक्कम तसेच ठेवीदारांची ठेवी बँकेत अडकल्यामुळे अनेकांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे. सध्याच्या परिस्थितीत सदरील श्री. मंगलनाथ मल्टिपल निधी अर्बन बँक ही बंद आहे त्यामुळे खातेदारांसह ठेवीदार दररोज या बँक समोर चकरा मारत आहेत. या संस्थेत पिग्मीच्या विड्रॉल सह, खातेदारांची गोल्ड लोन मोठ्या प्रमाणात अडकले आहेत तसेच या संस्था चालकांनी काही लोकांचे सोने खाजगी सावकाराकडे दिलेले आहे अशी प्राथमिक माहिती मिळाली आहे. बँकेत जमा केलेले सोने खाजगी सावकाराकडे देणे कितपत योग्य आहे यांचीही सखोल चौकशी करावी संबंधित चेअरमन अनेक दिवसांपासून फरार असल्यामुळे ही गेल्या एक महिन्यापासून बँक बंद असल्याचे दिसून येत आहे. खातेदारांचे लाखो रुपयांची रक्कम या शाखेत अडकले आहेत. त्यामुळे आत्महत्या करण्याची वेळ असल्याचे खातेदार वर्गातून बोलले जात आहे. संबंधित चेअरमन हे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे बोलले जात आहे. चेअरमन हे खातेदार व ठेवीदारांच्या माध्यमातून स्वतःचाच फायदा करून घेतला असल्याने ठेवीदारांसह खातेदार मोठ्या अडचणीत सापडले आहेत. संबंधित चेअरमनसह संचालक मंडळ यांच्यावर एमपीआयडीचा प्रस्ताव दाखल करून सर्व प्रॉपर्टीचा लिलाव होऊन ठेवीदारांच्या ठेवी व खातेदारांची रक्कम परत मिळावी अशी मागणी होत आहे. तसेच या प्रकरणी महाराष्ट्र ठेवीदार कृती समितीचे मुख्य प्रवर्तक सचिन उबाळे यांनी लक्ष घालून आवाज उठवा अशी देखील मागणी ठेवीदारांसह खातेदार वर्गाकडून होत आहे.




बीड जिल्ह्यात मल्टीस्टेटच्या अनेक घोटाळे सातत्याने उघडकीस येत आहेत याप्रकरणी जिल्हा प्रशासनाने लक्ष देणे गरजेचे असताना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी रुजू झाल्याच्या नंतर महाराष्ट्रभर गाजलेल्या व बंद पडलेल्या ज्ञानराधा मल्टीस्टेट प्रकरणी जनता दरबार घेतला परंतु पुढे कुठलीही कारवाई न झाल्यामुळे ठेवीदारांत निराशा पसरली आता संबंधित पंडित यांच्यावर गुन्हे दाखल होण्याची प्रक्रिया सुरू आहे परंतु ठेविदारांचे पैसे कधी मिळणार याकडे ठेविदारांचे लक्ष लागले आहे. बँकेतील खातेदाराचे गोड लोन सावकाराच्या ताब्यात देऊन त्यावर सार्वधिक रक्कम मिळेल

पान २ वर

### गेवराईतील पती-पत्नी पंडित यांच्या संपर्कात?

शहरातील वादे नगर, कोल्हेर रोड येथे वास्तविक असलेले श्री प्रशांत शेलार व त्यांची पत्नी सुनीता प्रशांत शेलार फरार झालेल्या केशव पंडित यांच्या सातत्याने संपर्कात आहेत. त्यामुळे पोलीस प्रशासनाने यांची सखोल चौकशी करून गोरगरीब ठेवीदारांच्या हक्काचे पैसे परत करावे अशी, मागणी ठेवीदार वर्गातून होत आहे. तसेच संबंधित चेअरमन केशव पंडित यांच्याविरोधात गेवराई पोलीस स्टेशनला तक्रार दाखल झाली आहे. यापुढे पोलीस प्रशासन काय कारवाई करणार हे पाहणे गरजेचे ठरत आहे.

## हातातोंडाशी आलेल्या लाख मोलाच्या मेंथीवर अज्ञांताकडून विषारी औषधांची फवारणी!

### आष्टी तालुक्यातील घाटापिंपरी येथील घटना

आष्टी । प्रतिनिधी

महिन्यापुर्वी मोठ्या आशेने एक एकरात केलेली मेंथी आर्थिक चणचण दुर करून कुटुंबाला हातभार लागेल या आशेनी काढणीला आलेल्या लाख मोलाच्या मेंथीवर दोन दिवसापुर्वी अज्ञांताकडून विषारी औषधांची फवारणी केल्याने हातातोंडाशी आलेली मेंथी जळून गेल्याची घटना घाटापिंपरी येथे घडली आहे.

आष्टी तालुक्यातील घाटापिंपरी येथील शेतकरी विठ्ठल पंढरीनाथ मुटके यांची येथील तलावालगत असलेल्या एक एकरात शेतात काही दिवसांपुर्वी मेंथी शिंपली होती. यातून आर्थिक हातभार लागेल या मोठ्या आशेने ही तरकारी शेती केली होती. उन्हाळ्यात पाण्याची मारामार असताना देखील तिला जपले होते. अवकाळी पावासाने देखील नुकसान झाले नव्हते. पण दोन दिवसापुर्वी अज्ञांताकडून एकरातील मेंथीवर विषारी औषध फवारणी करण्यात आल्याने पुर्णपणे मेंथी जळून गेली आहे. यामुळे तीन लाखांचे आर्थिक नुकसान झाले असून आर्थिक संकट ओढावले असल्याने शेतकरी चिंतेत आहे.

## जिल्ह्यामध्ये मनाई हुकूम जारी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हयात कायदा व सुव्यस्थेबाबत आगामी काळात दि. ७ जून २०२५ रोजी मुस्लीम धर्मीय लोकांचा पवित्र सण बकरी ईद व तिथीप्रमाणे छत्रपती संभाजी महाराज यांची पुण्यतिथी एकाच दिवशी होत आहे. तसेच राजकिय पक्ष संघटनेच्या वतीने न्याय मागणीसाठी विविध प्रकारचे निदर्शने, अंदोलने, उपोषण,मोर्चे इत्यदी होण्याची शक्यता आहे.

यामूळे अचानक घडणा-या घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्याअनुषंगाने कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहे. दिनांक ६ जून २०२५ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते दि. २० जून २०२५ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तिचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था आबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.



## वडवणी पोलिसांच्या सतर्कतेमुळे सुधारगृहातून पळून गेलेल्या दोन अल्पवयीन मुली ताब्यात घेण्यात यश

वडवणी । प्रतिनिधी

पोलीस ठाणे वडवणी येथील २० दिवसापूर्वी व पोलीस ठाणे दिंद्रुड येथील चार ते पाच महिन्यापूर्वी ०२ अपहरणाचे गुन्हे दाखल होते या गुन्ह्यामध्ये पीडिता असलेल्या ०२ अल्पवयीन मुली सरकारी महिला स्वाधार गृह बीड येथे दाखल होत्या. दिनांक ०७ जून २०२५ रोजी सकाळी या दोन्ही अल्पवयीन मुली महिला स्वाधार गृहातून पळून गेल्या. याची माहिती वडवणीच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा व्हगाडे यांना मिळाली.

अशा मुली शहराबाहेर गेल्या तर त्यांचा कुणीही गैरफायदा घेऊ शकतो याचे गांभीर्य ओळखून त्याचे शोधाबाबत अधिक तपास केला असता, या दोन्ही मुली विठ्ठल रखुमाई मंदिर, ग्रामसेवक कॉलनी बीड,परिसरात असल्याची माहिती मिळाली. त्यावरून वडवणीचे दुय्यम अधिकारी ीळि चव्हाण यांना सदर ठिकाणी तात्काळ पाठवून त्या दोन्ही अल्पवयीन मुलींना थांबवून ठेवले, व शिवाजीनगर पोलीस ठाणे चे पोलीस निरीक्षक श्री पवार यांना फोन करून माहिती देत शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथील स्टाफ बोलावला. दोन्ही मुली पुन्हा स्वाधारगृहात दाखल करण्यासाठी शिवाजीनगर महिला पोलिसांचे ताब्यात दिल्या. त्यानंतर त्या महिला स्वाधारगृहाचे यांचेमार्फतीने अध्यक्ष बालकल्याण समिती यांच्याकडे हजर करण्यात आल्या.

ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, यांचे मार्गदर्शनाखाली वडवणी पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा व्हगाडे, पोलीस उपनिरीक्षक चव्हाण व शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे रविंद्र गोवर्धन आघाव, शीतल केशव जोगदंड, बाळु बाजीराव राहाडे, नवनाथ बंडू डाके यांनी केली आहे.

## वडवणी पोलिसांकडून तरुण मुलांचे लग्न करून देण्याच्या बहाण्याने पैसे लूट करणारी टोळी गजाआड

बीड । प्रतिनिधी

दिनांक ०३ जून २०२५ रोजी वडवणी पोलीस स्टेशन येथे मनीषा नरेंद्र ननावरे वय २५ वर्षे राहणार संगमनेर, ही तिची मैत्रीण वैभवी राम शेटे राहणार, संगमनेर,अहिल्यानगर हिला घेऊन आली व तिने पोलिसांना माझ्या मैत्रिणीला तिचे घरच्यांनी डांबून ठेवले होते व मी तिला सोडवले अशी हकीकत कथन केली, सुरुवातीला महिला अधिकारी या नात्याने वडवणी प्रभारी -झख वर्षा व्हगाडे यांनी वैभवी व मनीषा हिची व्यवस्थित प्रेमाने चौकशी केली, तसेच सोडवणूक करणाऱ्या ड्रायव्हरला देखील बोलवून



घेतले, परंतु या तिघांनाही बोलवून घेतल्यानंतर तींघांची स्वतंत्र चौकशी केली असता मनीषाचे दोन दिवसापूर्वी नुकतेच गणेश बंडू घाडगे व २८ वर्षे राहणार उपळी, वडवणी या तरुणाशी लग्न झालेले असून त्यांनी सध्या लग्नासाठी मुली मिळत नाही.

आजारासाठी मनीष्याच्या मावशीला व तिच्या काकाला त्यांनी तीन लाख रुपये नगदी दिले असे कळाले, तसेच मनीषा कडे वेगवेगळे आधार कार्ड असून तिचे काका व मावशी हे देखील नकली असल्याचे समजले, लग्नासाठी मुली मिळत नसल्याने अनेक गरीब सर्वसाधारण, तसेच प्रतिष्ठित कुटुंबांना अशांचा शोध घ्यायचा, लग्न होत नसल्या तरुणांना सुंदर मुलगी दाखवणे, नंतर तिच्या आईला कॅन्सर झाला आहे, किंवा तिला आई-वडीलच नाहीत किंवा इतर आर्थिक अडचण सांगून पैसे उकळणे, व पुन्हा पैसे घेवुन पळून जाणे किंवा पळून जायला जमले नसल्यास त्याच कुटुंबा विरुद्ध पोलीस स्टेशन येथे जाऊन तक्रार दाखल करणे, आणि अशावेळी त्या कुटुंबाने फसवणुकीच्या तक्रारीबाबत माघार घेणे, मी पुन्हा नवीन ग्राहक शोधणे, अशी या

पान २ वर

# सिदाजी आप्पा चौकात पाईपलाईन दुरुस्तीसाठी

# खोदलेला खड्डा अपघाताला निमंत्रण

## गेवराई नगर परिषदेच्या बांधकाम विभागाचे दुर्लक्ष ?

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई शहरातील सिदाजी आप्पा चौकात पाईपलाईन दुरुस्तीसाठी भले मोठे खड्डे खादले आहे पोलीस स्टेशन परिसरातील असलेल्या महात्मा फुले सिटी सेंटर येथे तळघरात पावसाळ्यामुळे पाणी साचत होते यासाठी ब्लॉक झालेली पाईपलाईन मोकळी करण्यासाठी पोलीस स्टेशन रोडला भला मोठा खड्डा करण्यात आला आहे हा खड्डा अपघाताला निमंत्रण देण्यास ठरत आहे याकडे गेवराई नगर परिषदेच्या बांधकाम विभागाचे दुर्लक्ष असल्याचे पाहायला मिळते.अपघात होण्याच्या पूर्वीच हा खड्डा भरून काढणे महत्त्वाचे ठरणार आहे महत्त्वाचे ठरणार भरून काढणे महत्त्वाचे ठरणार आहे याकडे नगरपरिषदेने तातडीने लक्ष घालून हा खड्डा बुजून रस्ता मोकळा करावा अशी शहरवासीयातील नागरिकांची मागणी आहे.



गेवराई शहरातील मुख्य वस्तीत असलेल्या या रस्त्यावर येणाऱ्या जाणाऱ्या वाहन चालकाला मोठी कसरत करावी लागत असल्याचे अनुभवायला मिळाले हा चौक मुख्य असल्यामुळे गेवराई नगर परिषदेच्या कामकाजाच्या इतिहासात पहिल्यांदा असे घडले असेल की भला मोठा खड्डा या ठिकाणी खादुन ठेवला आहे पोलीस स्टेशन या कार्यालयाकडे जाण्यासाठी फोर व्हीलर व दुचाकी चालवणाऱ्यांना अडथळा निर्माण होत आहे या खड्ड्यात एखादा अपघात घडून आला तर याला जबाबदार कोण? अशी खंत नागरिक व्यक्त करत आहेत याप्रकरणी दैनिक महाराष्ट्र आरंभाचे तालुका प्रतिनिधी यांनी नगर परिषदेचे मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांना संपर्क केला असता त्यांनी फोन उचलला नसल्याची माहिती प्रतिनिधींनी दिली. त्यामुळे नगरपरिषद कार्यालयाच्या कामकाजाविषयी बाजू समजू शकली नाही.

# तेलगाव रोड ते राष्ट्रवादी भवनपर्यंत डिवायडर मधुन रस्ता सोडा : खुर्शीद आलम

## जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले तर आ.भैय्यानी स्पॉट पाहणी केली

बीड । प्रतिनिधी

बीड शहराच्या मध्यभागातून जालना रोड ते तेलगाव रोड मार्गे पुढे जाणार्या नॅशनल हायवे रोडचे काम सुरू आहे. सदर रस्त्यावर डिवायडर टाकण्याचे काम सुरू आहे. सदर रस्त्यावरील डिवायडर मधुन आवश्यक ठिकाणी रस्ता सोडण्यात यावे अशी मागणी खुर्शीद आलम यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने बीडचे जिल्हाधिकारी साहेब तसेच बीडचे आ.संदिप भैय्या क्षीरसागर यांच्याकडे केली आहे.



निवेदनात म्हटले आहे की बीड ते परळी तेलगाव रस्त्याचे काम सुरू असून सदर रस्त्याच्या सेंटरमध्ये डिवायडर टाकण्याचे काम सुरू आहेत. बीड शहरातील शरद पवार राष्ट्रवादी भवन ते तेलगाव नाका परळी रोड बीड बायपास पुला पर्यंत ५ ते ६ किलोमीटरचे अंतर असुन सदर मुख्य रोड भर वस्ती मधुन जातोय सदर रस्त्याच्या दोन्ही बाजुने मोठमोठ्या लोकसंख्यावाले मोहल्ले वस्त्या आहेत.

सदर मुख्य रस्त्याचे दोन्ही बाजुला शाळा महाविद्यालय, दवाखाने, मंगल कार्यालय, मोठमोठे धार्मिक स्थळे आणि शापींग सेंटर आहेत त्यासाठी दक्षिण बाजुचे लोकांना उत्तर बाजूला येणे जाणेसाठी आणि उत्तर बाजूच्या लोकांना दक्षिण बाजुला येणे जाणेसाठी डिवायडर मधुन रस्ता सोडने अति आवश्यक आहे. हॉटेल शांताई जालना रोड ते सह्याद्री हॉटेल राष्ट्रवादी भवन पर्यंत डिवायडर मधुन ९ नऊ रस्ते सोडलेले आहेत. अगदी त्याच पद्धतीने राष्ट्रवादी भवन ते बार्शीनाका बीड बायपास पुलापर्यंत रस्ते सोडण्यात यावे अशी मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी जॉन्सन साहेब आणि आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडे देण्यात आले. सदर मागणीची दखल घेऊन आ.संदिप भैय्या क्षीरसागर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सोबत घेऊन स्पॅट पाहाणी करून संबंधितांना सुचना दिल्या आहेत.

यावेळी माजी आ.सलीम साहेब, मा.सभापती खुर्शीद आलम, अभियंता भोपडे साहेब, महेश शिंगण, मुफ्ती कौसर साहेब, वकील सर, शेख वाजेद, शेख अकील, मुश्ताक भाई, चक्रधर कदम, खदीर इनामदार, आकाश शिंगण, सैय्यद एजाज, शेख मोहसीन, अक्षय शिंगण, शेख कलीम, बंडू खेडकर, मोमीन अझहर, बालाजी शिंगण, फैय्याज मन्यार, ओम पाटील, शेख फारोक, योगेश भांडवले, मोमीन शेहबाज, अजय घोडके वगैरे उपस्थित होते.

# बहुजनांचे नेते संजय भैया सोनवणे यांना महात्मा फुले महामंडळावर संधी द्या

## एमआरपीच्या शिष्टमंडळाची अजित दादांना मागणी

गेवराई । प्रतिनिधी

महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे संस्थापक अध्यक्ष बहुजनांचे नेते संजय भैया सोनवणे यांना महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळावर संधी देऊन तमाम आंबेडकरी जनतेची इच्छापूर्ती करावी व तमाम आंबेडकरी जनतेच्या भावनांचा कदर करावा आत्ताच होऊन गेलेल्या गेलेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीमध्ये मित्र पक्ष म्हणून महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षांचा महायुतीला पाठिंबा दिला होता व महाराष्ट्रात रिपब्लिकन पक्षाची ताकद संपूर्ण महाराष्ट्र मध्ये आपल्या पाठीशी उभी केली होती परिणामी देशात व राज्यात महायुतीची सत्ता आली.



येणारे काळात स्थानिक स्वराज्य संस्था इतर सर्वच निवडणुकीत पक्षाची संपूर्ण ताकद आपल्या पाठीशी राहील यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वाटेला आलेले महामंडळ अध्यक्ष नियुक्ती मध्ये आपण महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष बहुजनांचे नेते महाराष्ट्रातील दलित चळवळीतील अभ्यासू दूरदृष्टी नेतृत्व बहुजनांचे नेते संजय भैय्या सोनवणे यांना संधी द्यावी ही संपूर्ण महाराष्ट्रातील तमाम आंबेडकरी जनतेची व पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते यांची इच्छा आहे. तरीपण पक्षप्रमुख संजय भैय्या सोनवणे यांना लवकरात लवकर महामंडळावर संधी देण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री शिव फुले शाहू आंबेडकर यांच्या विचारधारेवर चालणारे नामदार अजित दादा पवार साहेब यांच्याकडे महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या शिष्टमंडळाने मुंबई मध्ये भेटून मागणी केली. या सिस्टमंडळामध्ये सोलापूर जिल्ह्याचे दोन्ही जिल्हाध्यक्ष महेंद्र जाधव व लखन भंडारे युवक चे ऍड सोनवणे, विजय बनसोडे ठाणे जिल्हाध्यक्ष दुर्गेश भाऊ उघडे बीड जिल्हाध्यक्ष विकास गायकवाड इत्यादी पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत निवेदन देण्यात आले.

# एमपीडीए कायद्याअंतर्गत हातभट्टी दारुचा चोरटा व्यापार करणाऱ्या इसमाची हर्सल कारागृहात रवानगी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी जिल्हयाची धुरा सांभाळल्या पासुन शर्थीचे प्रयत्न चालवले आहेत त्यांना बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी मा. श्री. विवेक जॉन्सन यांची खंबीर साथ लाभली आहे. बीड जिल्ह्यातील गुंडगिरीचे व गुन्हेगारीचे व वाळु माफीयांचे समुळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवुन चझऊ- कायद्या अंतर्गत बऱ्याच गुन्हेगारांवर व गुंडावर कार्यवाही करण्याचे योजिले आहे. त्या अनुषधांने पोनि पो.स्टे. संभाजीनगर परळी वै, यांनी दिनांक १२.०५.२०२५ रोजी इसम नामे रघुनाथ शिवाजी राठोड वय ६० वर्षे रा. धारावती तांडा ता. परळी जि.बीड याचे विरुद्ध चझऊ- कायद्याअंतर्गत स्थानबद्ध करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक बीड यांच्या मार्फतीने मा. जिल्हादंडाधिकारी साहेब बीड यांना सादर केला होता.



सदर स्थानबध्द इसमा विरुद्ध पोलीस ठाणे संभाजीनगर परळी येथे हातभट्टीची दारू जवळ बाळगणे, चोरटी विक्री करणे, अवैध दारुची वाहतुक करणे वगैरे स्वरुपाचे ०८ गुन्ह्याची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. सर्व गुन्हे न्यायप्रविष्ट आहेत. सदरील इसम हा हातभट्टीच्या दारुचा चोरटा व्यापार करीत असल्याने पोलीसांची त्याचेवर बऱ्याच दिवसांपासून करडी नजर होती. सदर इसम हा पोलीसांची नजर चुकवुन हातभट्टीच्या दारुचा चोरटा व्यापार करीत होता. सदर इसमावर यापूर्वी महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ९३ प्रमाणे ०२ वेळा प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आली होती. परंतु सदर इसम हा प्रतिबंधक कारवाईस न जुमानता पुन्हा जोमाने हातभट्टीची दारू ताब्यात बाळगुन तिची चोरटी विक्री करण्याचे गुन्हे करण्याचे चालुच ठेवुन होता. त्यामुळे पो.स्टे. संभाजीनगर हद्दीत व परळी शहरात व परिसरातील सर्वसामान्य नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला होता.

सदर प्रकरणात श्री. विवेक जॉन्सन जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी बीड यांनी दिनांक ०३.०६.२०२५ रोजी सदर प्रकरणाच्या अनुषंगाने एम.पी.डी.ए. कायद्याअंतर्गत आदेश पारीत करून बीड जिल्ह्यातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधीत राहावी हा उदात्त दृष्टीकोन डोळयासमोर ठेऊन सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून हसुल कारागृह छत्रपती संभाजीनगर येथे हजर करून स्थानबध्द करणे बाबत आदेश पारीत केले होते. त्यानंतर पोलीस अधिक्षक बीड यांनी सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून कार्यवाही करण्याच्या सुचना पोनि संभाजीनगर परळी वै. व पो.नि. स्थागुशा बीड यांना दिल्या होत्या. सदर आदेशावरुन पो.नि. स्थागुशा यांनी ताबे पोलीस अंमलदार यांचे मार्फत सदर इसमास दिनांक ०७.०६.२०२५ रोजी ताब्यात घेऊन पो.स्टे. संभाजीनगर परळी येथे हजर केले. पो.नि. संभाजीनगर यांनी सदर इसमास दिनांक ०७.०६.२०२५ रोजी ०७.२९ वा. कायदेशीररीत्या ताब्यात घेऊन योग्य पोलीस बंदोबस्तात हर्सल कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे स्थानवध्द करणे करीता रवाना केले आहे.

# चाकरवाडीत उद्यापासून प्रदीप मिश्रांची शिवमहापुराण कथा

बीड । प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महान संत ज्ञानेश्वर माऊलीदादा महाराज श्री क्षेत्र चाकरवाडी यांच्या पंचविसाव्या पुण्यस्मरणार्थ रौप्यमहोत्सवी सोहळयाची सुरुवात शनिवार दि. ०४ जून रोजी होणार असून अखंड हरिनाम सप्ताहाच्या आयोजनाची तयारी तपोनिधी शांतीब्रहगुरुवर्य महादेव महाराज (तात्या) श्रीक्षेत्र चाकरवाडी यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण झाली आहे. प.पू. श्री प्रदीप मिश्राजी महाराज शिवमहापुराण कथेची जय्यत तयारी करण्यात आली आहे. माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळयास भाविक भक्तानी जास्तीत जास्त सख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन तपोनिधी, शांतीबह, गुरुय महादेव महाराज (तात्या) श्री क्षेत्र चाकरवाडी यांच्या वतीने करण्यात येत आहे.







चारलाख लोकांची रोज बसण्याची जेवणाची व्यवस्था

अखंड हरिनाम सप्ताह मध्ये आंतरराष्ट्रीय शिवकथाकार प. पू. प्रदीप मिश्राजी सिहोरवाले यांची शिवमहापुराण कथा दुपारी १ ते ४ वाजेपर्यंत दि.०८ जून ते १४ जून दरम्यान होईल, सायंकाळी अभंगवाणी (संगीत भजन) महाराष्ट्रातील ख्यातनाम गायक मंडळी सादरीकरण करणार आहे. रात्री अभग संकीर्तन सेवा दि.०७ जून शनिवार लक्ष्मण महाराज मेंगडे, (श्री क्षेत्र बंकटस्वामी महाराज मठ संस्थान श्री क्षेत्र नेकनूर), दि.०८ जून रविवार प्रकाश महाराज बोधले, (संतपिठ श्री क्षेत्र पैठण तथा राष्ट्रीय अध्यक्ष अ. भा.वा.मंडळ), दि.०९ जून मोमवार अमृताश्रम स्वामी महाराज (मंगलमूर्ती देवस्थान, राजूरी नवगण), दि.१० जून रोजी मंगळवार भागवताचार्य मुकुन्द काका जाटदेवळेकर, दि.११ जून बुधवार रोजी माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी पुण्यस्मरणार्थ गुलालाचे कीर्तन वारकरी संप्रदायभूषण रामायणाचार्य रामरावजी महाराज ढोक, नागापूरकर यांचे सकाळी १० ते १२ होणार आहे. रात्री रामायणाचार्य समाधानजी महाराज शर्मा यांचे रात्री ८ ते १० वेळेत होणार आहे. दि.१२ जून गुरुवार रोजी व्याकरणाचार्य अर्जुन महाराज लाड गुरुजी, श्री क्षेत्र होळ, दि.१३ जून शुक्रवार रोजी महादेव महाराज राऊत, बीड, यांची कीर्तन सेवा होईल. दि.१४ जून शनिवार रोजी काल्याचे कीर्तन संदीपान महाराज हासेगावकर यांचे होणार आहे.

कीर्तन सेवा झाल्यानंतर हरिजागर, भारुड, हरिपाठ, काकडा भजन, असे भव्य दिव्य कार्यक्रमांचे आयोजन श्री क्षेत्र चाकरवाडी येथे माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळयास करण्यात आले आहे. जास्तीत जास्त भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य महादेव महाराज (तात्या) चाकरवाडीकर यांनी केले.

### दैनंदिन कार्यक्रम

अखंड हरिनाम सप्ताह मध्ये पहाटे ०४ ते ०६ वाजता काकडा भजन, ०६ ते ०७ विष्णू शिव सहस्र नाम, सकाळी ०७ ते १० वाजता ज्ञानेश्वरी) पारायण, ११ ते १२ गाथा भजन, रोज दुपारी ०१ ते ०४ वाजता प.पूज्य प. प्रदीप मिश्राजी यांची शिवमहापुराण कथा, ०५ ते ०६ हरिपाठ, ०६ ते ०८ अभंगवाणी संगीत भजन, रात्री ८.३० ते १०:३० महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकाराची कीर्तन सेवा, रात्री ११ वाजता भारुड हरिजागर होईल.

### तीन एकरवर भोजन व्यवस्था

श्री क्षेत्र चाकरवाडी येथे माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळयास देशभरातून भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात उपस्थित राहणार आहे. त्यामुळे भाविकांची संख्या लक्षात घेऊनतीन एकर जागेवर भोजन व्यवस्था करण्यात आली असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

### १५० एकर पार्किंग

विसाव्या शतकातील महान संत श्री ज्ञानेश्वर माऊली दादा चाकरवाडीकर यांच्या रौप्यमहोत्सवी सोहळयानिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाला येणाऱ्या भाविकांची सख्या पहाता १५० एकर जागेवर पार्किंग व्यवस्था करण्यात आली आहे.

### व्यासपीठ पूजन

शनिवार दि.०७ जून रोजी सकाळी मुख्य कार्यक्रम व्यासपीठ पूजन होणार आहे मंगळ कलश स्थापन, दीपरज्वलन, ग्रंथ पूजन, टाक मृदुंग वीण पूजन, माजरोहण उपमुक्त सेवा मठाधिपती लक्ष्मण महाराज मेंगडे श्री बंकट स्वामी मठ संस्थान श्री क्षेत्र नेकनूर, श्री श्री १०८ श्रीगुरु चंद्रशेखर शिवाचार्य महाराज मजलगावकर, तुकाराम महाराज मुंडे शास्त्री, वैराग्यमूर्ती रामकृष्ण राघवे बापू महाराज, शांतीब्रम्ह गुरुवर्य नवनाथ वावा महाराज श्री क्षेत्र गोरखनाथ टेकडी, एकनाथ महाराज सासुरा, ज्ञानोबा महाराज खाडे श्री क्षेत्र बरड, श्री विश्वनाथ अप्पा श्री क्षेत्र। कपिलघर, श्री महादेव महाराज भारती श्री क्षेत्र बलेश्वर संस्थान संपत महाराज गित्ते यांच्या सह साधुसंतानी व्यासपीठ पूजनाने अखंड हरिनाम सप्ताह सुरवात होणार आहे.

# जागर प्रतिष्ठानचे अध्यक्ष किसन पाटील यांनी उपस्थित राहण्याचे केले आवाहन

बीड । प्रतिनिधी

धारूर शहरातील गेल्या वर्षी प्रमाणे याही वर्षी जागर प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्याच्या वतीने महादुर्ग धारूर जिल्हा बीड या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५२ व्या राज्याभिषेक सोहळ्याचे भव्य दिव्य आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याला जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यावेळी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

दिनांक ८ जून २०२५ वार रविवार रोजी सायंकाळी चार वाजता स्वच्छता मोहीम, सायंकाळी पाच वाजता छत्रपती संभाजी महाराज व पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर यांची जयंती, व सायंकाळी ६. वाजता मर्दानी खेळ व लगेच देवीचा गोंधळ व ९ जून २०२५ सोमवार या कार्यक्रमाचे रूपरेषा सकाळी आठ वाजता पालखी सोहळा, सकाळी नऊ वाजता शिवराज्याभिषेक, सकाळी दहा वाजता पुरस्कार वितरण सोहळा व सकाळी ११ वाजता महाप्रसाद होईल. या शिवराज्याभिषेक सोहळ्याला महाराष्ट्र राज्यातून शिवभक्त येणार आहेत, अशी माहिती जागर प्रतिष्ठानचे अध्यक्ष किसन पाटील चव्हाण यांनी दिली आहे.

पान १ वरून...

## शेवटी गेवराईतील श्री मंगलनाथ मल्टिपल...

या आशेने चेअरमन यांचे लाडके मेव्हणे प्रशांत शेलार यांच्यात मिली जुली करत पैठण येथे एका नामांकित सोन्यांच्या दुकानदाराकडे काही खातेदारांचे सोने अडकले आहे. त्यात तो दुकानदार जाणीवपूर्वक जास्तीचे व्याजदर मागत असल्याने ते सोने देण्यास टाळाटाळ करतात. वेड्याचे सोंग घेऊन फरार झालेल्या केशव पंडित यांच्या सातत्याने संपर्कात त्यांच्या भगिनी सुनीता प्रशांत शेलार ह्या असतात अशी खात्रीलायक माहिती मिळत आहे. गेवराई शहरातील ज्योती क्रांती मल्टीस्टेट या ठिकाणी शाखेची कुठलाही संबंध नसलेल्या प्रशांत शेलार यांच्या नावे खातेदारांचे गोड लोन तिथे घाण ठेवलेले आहे. बँकेत ठेवलेले सोने हे इतर लोकांच्या नावे कसे ठेवले याची देखील चौकशी व्हायला पाहिजे. काय या सोन्यावर पंडित यांच्या मेव्हण्याला डल्ला मारायचा होता की काय असा सवाल खातेदारात उपस्थित होत आहे.

## वडवणी पोलिसांकडून तरुण मुलांचे लग्न करून

टोळीची गुन्हे करण्याची पद्धत आहे. रणजीत अहिरे या आरोपीच्या चक-१७-ए २८८९ मारुती सुझुकी या गाडीचा मुलगी दाखवण्यासाठी तसेच एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी वापर करत असे, यामध्ये आतापर्यंत वडवणी पोलिसांनी १) वैभवी शेटे (नवरी), २) मनीषा ननावरे (नवरीची मैत्रीन) ३) रणजीत अहिरे (ड्रायव्हर) तिघेही राहणार संगमनेर अहिल्यानगर व ४)यमुनाबाई शिंदे, (मध्यस्थी) यांना अटक केली असून यात एकाच नावाचे विविध आधार कार्ड, व एक चार चाकी असा दोन लाखांचा मुद्देमाल जप्त आहे. तरी अशा प्रकारचे प्रकरणे आल्यास त्याला बळी लग्न जुळवण्यासाठी कोणत्याही प्रकारे पैसे देऊ नये असे आव्हान बीड पोलिसांनी नागरिकांना केले आहे. ही कारवाई अधीक्षक नवनीत कावत व अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली वडवणीच्या प्रभारी अधिकारी –ळि वर्षा व्हगाडे, ळि संजय राठोड, ळि राजू राठोड, पुरुष अंमलदार विलास खरात, अविनाश गवळी व महिला पोलीस सुवर्णा खोसे यांनी केली.

# सामाजिक न्याय विभागाला कोणी न्याय देता का न्याय? सामाजिक न्यायमंत्र्यावर टाहो फोडण्याची वेळ

## लाडकी बहिण योजनेसाठी सामाजिक न्याय ८२० कोटी ६० लाखांचा निधी वळवला : डॉ.गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी

लाडकी बहिण योजनेसाठी राज्य सरकारने पुन्हा एकदा सामाजिक न्याय विभागाच्या अनुसूचित जाती घटकांसाठी असलेला ४१० कोटी ३० लाखांचा निधी वळवला असुन यावरून सामाजिक न्यायमंत्री संजय सिरसाटांनी जाहिररित्या अर्थमंत्री अजित पवार यांच्यावर टीका केल्याने एकंदरीतच सामाजिक न्याय विभागाला कोणी न्याय देता का न्याय असे म्हणण्याची वेळ आल्याचे सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी म्हटले असुन या आधीही ४१० कोटी ३० लाख रुपयांचा निधी वळविण्यात आला होता. आतापर्यंत सामाजिक न्याय व विशेष विभागाचा एकुण ८२० कोटी ६० लाख रुपये वळविण्यात आले आहेत.

आदिवासी विभागाचा ३३५ कोटी ७० लाख रुपयांचा निधी ३ वेळा वळविण्यात आला असून एकुण आदिवासी विभागाचा आतापर्यंत १ हजार ७ कोटी रुपये वळविण्यात आले आहेत. एकंदरीतच सामाजिक न्याय व आदिवासी विभागाचे मिळुन लाडकी बहिण योजनेसाठी १८२७ कोटी ७० लाख रुपयांचा निधी महिला व बालविकास विभागाकडे वळविण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सामाजिक न्याय विभागाला मागील ५ वर्षाच्या तुलनेत यावर्षीची ७,३१७ कोटी रुपयांचा निधी कमी मिळाला आहे. वर्षभरात तब्बल ६ हजार ७६५ कोटी रुपयांचा सामाजिक न्याय विभागाचा निधी वळवला जाणार आहे. हा अनुसूचित जाती व आदिवासी समाजातील लोकांवर अन्याय असुन याविरोधात आंदोलनाचा ईशारा डॉ.गणेश ढवळे, शेख युनुस, रामनाथ खोड, सुदाम तांदळे, पांडुरंग हराळे, शेख मुबीन, रामधन जमाले यांनी दिला आहे.



आदिवासी आणि सामाजिक न्याय विभागाच्या लोकसंख्येनुसार निधी वितरित करण्यात यावा असा नियम आहे. मात्र सामाजिक न्याय विभागात कमी निधी मिळाल्याचं पहायला मिळत आहे. महाराष्ट्रात एकूण ११.२३ कोटी लोकसंख्या आहे. त्यापैकी अनुसूचित जातीची लोकसंख्या १.३३ कोटी आहे. म्हणजेच एकूण लोकसंख्येच्या ११.८४% अनुसूचित जातीची लोकसंख्या आहे. त्यामुळे सामाजिक न्याय विभागाला एकूण तरतुदींच्या ११.८४% निधी मंजूर होणे अपेक्षित असताना ८ ते साडे ८ टक्के निधी मंजूर झाला आहे. त्यामुळे २.४४ % तूट आहे.

**मागील ५ वर्षात प्रत्यक्षात आलेली तुट ( कोटीत)**
सन २०२१-२२. ४,७०५ कोटी
सन २०२२-२३. ५,४७० कोटी
सन २०२३-२४. ६४७६ कोटी
सन २०२४-२५ ६७६४ कोटी
सन २०२५-२६. ७३१४ कोटी

### सामाजिक न्याय विभागाला ७३१४ कोटी कमी निधी

यावर्षी सामाजिक न्याय विभागाला २९ हजार ९७२ कोटी रुपये मंजूर झाला आहे. त्यातील जवळपास ५००० कोटी लाडकी बहीण आणि इतर योजनांसाठी तरतूद केली आहे. त्यामुळे २९ हजार ९७२ कोटी पैकी २२ हजार ६५८ कोटी सामाजिक न्याय विभागाच्या योजनांसाठी आहे. त्यामुळे एकूण बजेटच्या ७३१४ कोटी रुपयांची तूट पहायला मिळत आहे.

मागील ५ वर्षातील आकडेवारी पाहता यावर्षी सर्वाधिक तुट सामाजिक न्याय विभागाची पहायला मिळत आहे. त्यामुळे वित्तमंत्री अजित पवार यांनी केलेला दावा आणि प्रत्यक्षात मिळालेला निधी यात मोठ्या प्रमाणावर तफावत आहे. यावर्षी सामाजिक न्याय विभागाला २२ हजार ६५८ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. लाडकी बहिण आणि ईतर योजनांच अतिरिक्त मिळुन २९हजार ९३२ कोटींचा निधी आहे.तरीही सामाजिक न्याय विभागामध्ये ७३१४ कोटी म्हणजेच एकूण बजेटच्या २.४४ टक्के निधी कमी प्राप्त झालेला आहे.

# परिसंवाद मेळाव्यास स्वाभिमान सिद्ध करण्यासाठी उपस्थित रहा : जोगदंड

बीड । प्रतिनिधी



वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांच्या संकल्पनेतुन आता तरी प्रकाश आंबेडकरांना समजुन घ्या या विषयावर परीसंवाद मेळावा आयोजीत करण्यात आला आहे. परिसंवादाचे प्रमुख मार्गदर्शक भास्कर भोजने तर प्रा. किसन चव्हाण राष्ट्रीय सदस्य तथा महासचिव तथा बीड जिल्हा प्रभारी, प्रा. विष्णु जाधव तक्रार निवारण समिती महाराष्ट्र राज्य वंचित बहुजन आघाडी विशेष उपस्थित असणार आहेत.

भारतीय रिपब्लिकन बहुजन महासंघ पक्ष (भारिप) ते वंचित बहुजन आघाडी च्या माध्यमाद्वारे ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांनी राजकीय व सामाजीक विषयांवर कसे काम केले. बहुजन समाजाला राजकीय व सामाजीक दृष्ट्या कसे मजबुत केले, बहुजन समाजाचे न्याय, समानता आणी हक्कासाठी कसा आवाज बुलंद करतात, आठरा पगड जातीच्या लोकांना संघटित करुन अकोला जिल्ह्यात सामाजीक समरस्ता तयार केला. ओबिसी वर्गाच्या आरक्षणांसाठी केलेले कार्य या व संबधित विषयांचे अवलोकन करण्यासाठी नागरीकांनी रविवार दि.०८ जुन २०२५ वेळ दुपारी ०१ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजीक न्यायभवन शासकिय विश्रामगृह समोर बीड येथे परिसंवाद मेळाव्यास उपस्थित रहावे. भारिप बहुजन महासंघाचे माजी बीड तालुकाध्यक्ष तथा वंचित बहुजन आघाडीचे पश्चिम विभाग बीड जिल्हा प्रसिद्धी प्रमुख राजेशकुमार जोगदंड यांनी प्रसिद्धी माध्यमाद्वारे आवाहन केले आहे.

# दिवाळी नवीन घरकुलात कार्यशाळेचे परळीत थाटात उद्घाटन



परळी। प्रतिनिधी

परळी तालुक्यातील प्रत्येकाच्या डोक्यावर हक्काचे छत असणे ही खूप मोठी गोष्ट आहे. दारिद्र्य सर्वात मोठी पिडा असून दारिद्र्याची व गरीबाची जाण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना असल्याने त्यांनी अतिशय कार्याबद्दल संपूर्ण देशभरात प्रत्येकाला हक्काचे घर देण्यासाठी घरकुल योजना सुरू केलेल्या आहेत. परळी अंबाजोगाई तालुक्यात घरकुलाचे उदाहरण टारगेट पूर्ण करा व दिवाळीपूर्वी प्रत्येकाच्या हातात घरकुलाची चावी द्या. या दृष्टीने काम करा असे निर्देश राज्याच्या पर्यावरण व पशुवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी आज येथे दिले.

शहरातील नटराज रंग मंदिरात परळी व अंबाजोगाई पंचायत समिती. ग्रामविकास व पंचायतराज विभागाच्या वतीने दिवाळी नवीन घरकुलात उपक्रम कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी त्या बोलत होत्या. आमदार धनंजय मुंडे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन. जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने. उपविभागीय अधिकारी. अरविंद लाटकर व्यंकटेश मुंडे तशिलदार गटविकास अधिकारी संजय केंद्रे समृद्धी दिवाणी शिवाजी मुंडे आदी यावेळी उपस्थित होते.

या कार्यशाळेत घरकुल योजनेच्या अंमलबजावणीसाठी विविध पातळीवरील अडचणीवर चर्चा करण्यात आली. जिल्हा प्रशासनाला उद्देशून पोस्ट संदेश देताना नामदार पंकजा मुंडे यांनी अधिकाऱ्यांना सहजगतीने आणि संवेदनशीलतेने काम करण्याचे निर्देश दिले रोहयो महसूल आणि ग्रामविकास विभाग यांनी परस्पर समन्वय ठेवून काम केले पाहिजे. म्हणजे दिवाळीपर्यंत लाभार्थ्यांना स्वत:च्या हक्काच्या घरात जाता येईल.



# धारुर येथे महर्षि सुश्रुत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिवराज्याभिषेक दिन साजरा

धारूर । प्रतिनिधी

छत्रपती शिवरायांची शिकवण आत्मसात करून विद्यार्थ्यांनी कृतिशील व्हावे, असे मत डॉ. हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले. ते महर्षि सुश्रुत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, धारूर या संस्थेत आज शुक्रवार, दि. ६ रोजी शिवराज्याभिषेक दिनसाजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री ना.मंगल प्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे व्हिडिओद्वारे ऑनलाईन उद्घाटन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमासाठी धारुर नगरपालिकाचे उपनगराअध्यक्ष बाळासाहेब गायकवाड व सामाजिक कार्यकर्ते डॉ. हनुमंत सौदागर, उपकोषागार आधिकारी श्री लाड, प्रसाद शिनगारे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख वक्ता म्हणून सामाजिक कार्यकर्ते डॉ हनुमंत सौदागर यांनी 'कुटुंब प्रबोधन' याविषयी सखोल मार्गदर्शन केले. बाळासाहेब गायकवाड यांनी महर्षि सुश्रुत व विविध कौशल्य विषयी माहिती दिली. श्री.लाड आणि शिनगारे यांनी दैनदीन जीवनात शिवाजी महाराजचे विचार व व कुटुंब प्रबोधन, पर्यावरण संरक्षण आणि नागरिकांचे कर्तव्य व शिष्टाचार कसे आमलांत आणता येईल याची माहीती दिली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष एस.जी घोळक होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पी.एस मुळे यांनी केले. आभार प्रदर्शन श्री.पी.डी. अंबरुळे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मा. प्राचार्य बेलेकर व्ही.एस. यांच्या मार्गदर्शनाखाली शेख जे.यू., श्रीमती खांदडे एस.जी, श्री म्हस्के एस.एन., श्री अभय वावळे, ए.पी. फाजील शेख, श्री काळुंके के.जी आदी कर्मचार्यांनी परिश्रम घेतले आहे. कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बीड जिल्हा सहकार बोर्डाच्या अध्यक्षपदी रामकृष्ण बांगर तर उपाध्यक्षपदी सुहास पाटील यांची निवड



बीड । प्रतिनिधी

जिल्हा सहकार बोर्डाच्या कार्यालयात दि. ४ जून रोजी नवनिर्वाचित संचालक मंडळांची सभा पार पडली. यावेळी बीड जिल्हा सहकार बोर्डाच्या अध्यक्षपदी सहकार महर्षी मा रामकृष्ण बांगर तर उपाध्यक्षपदी माजी नगरसेवक मा सुहास पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून श्री.ए टी सानप साहेब यांनी काम पाहिले. त्यांना बीड जिल्हा सहकार अधिकारी श्री आर.डी. वाघमारे साहेब यांनी सहाय्य केले.

याप्रसंगी ज्येष्ठ संचालिका धडाडीच्या नेत्या सुशिलाताई मोराळे, ज्येष्ठ संचालक मा कल्याण काका आखाडे, कैलास माने, पठाण नसीर खाँ दौलत खाँ, भगवान पाखरे, महादेव तोंडे, अश्रुबा आंधळे, राज्य सहकारी संघाच्या माजी संचालक सौ.संगीता पोकळे, अच्युत शिंदे, सौ. तारामती बांगर, सौ.किसकिंदा जाधव, किशोर राऊत, बाबासाहेब नागरगोजे, भुजंगराव आंधळे या नवनिर्वाचित संचालकांचा सत्कार करण्यात आला.



# भीमसिंह विद्यालयाच्या मुख्याध्यापकपदी भारत मगर

बीड । प्रतिनिधी

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ संचलीत भीमसिंह विद्यालय, मातोरी, ता. शिरूर कासार या शाळेच्या मुख्याध्यापकपदी भारत मगर यांची निवड झाली आहे. मुख्याध्यापकपदी निवड होताच, भारत मगर यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

सिरसमार्ग येथील समर्थ विद्यालयात कार्यरत असलेले विद्यार्थीप्रिय व ज्येष शिक्षक भारत मगर यांची मातोरी येथील भीमसिंह विद्यालयाच्या मुख्याध्यापकपदी निवड झाली आहे. काल त्यांनी पदभार स्विकारला. समर्थ शिक्षण प्रसारक मंडळाचे सचीव सुभाषदादा पवळ यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. भारत मगर सर यांची मुख्याध्यापकपदी निवड होताच, सिरसमार्ग ग्रामस्थांनी आनंदोत्सव साजरा केला. संस्थेचे सचिव सुभाषराव पवळ, भारतराव तांबारे, राजेंद्र केसभट, बाबुराव पठाडे, अशोक पवळ, गणेश तळेकर, बहीर, कळमकर, सर्जेराव तांबारे, जामकर, प्रकाश शिंदे, सचिन रडे, बांगर आदीसह ग्रामस्थ, शिक्षणप्रेमी, विद्यार्थी, मित्रपरिवार व कर्मचारीवृंद यांनी भारत मगर सर यांचे अभिनंदन करून, पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

## नियुक्ती जाहीर



सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ या वृत्तपत्रासाठी नव्याने गेवराई तालुका प्रतिनिधी म्हणून शुभम घोडके यांची नियुक्ती करण्यात येत आहे. याची सर्व वाचक, जाहिरातदार, बातमीदार, राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते तसेच प्रशासनातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी नोंद घ्यावी!

- व्यवस्थापक
सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ

# लोकमाता अहिल्यामाई होळकर पुरस्काराने मिठ्ठू त्रिंबक आंधळे सन्मानित

तलवाडा । प्रतिनिधी

सदैव आपल्या आदर्श कार्यातून कार्य करणारे एसटी वाहक मिठ्ठू त्रिंबक आंधळे होय. लोकमाता अहिल्यामाई होळकर विचारमंच, मानवतावादी सांस्कृतिक चळवळ, आम्ही भारतीय महिला मंच कोल्हापूर या सुप्रसिध्द समाजसेवी संस्थेने त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक तसेच विविध कार्याची दखल घेऊन लोकमाता अहिल्यामाई होळकर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. हा पुरस्कार त्यांनी त्यांची पत्नी सौ. वैशाली आंधळे तसेच सासरे श्री. भानुदास सिरसाट यांच्यासह स्विकारला.

हा सन्मान कार्यक्रमाचे अध्यक्ष बबनराव रानगे (ज्येष्ठ सामाजिक) प्रमुख वक्त्या लेखिका तथा विचारवंत मुंबई डॉ. वर्षा चौरे, प्रकाशक अनिल म्हमाने, प्रा. टी. के. सरगर, ड. करुणा विमल, विश्वासराव तरटे (अध्यक्ष, दिक्षा चॅरिटेबल ट्रस्ट, कोल्हापूर) मुख्य आयोजक अंतिमा कोल्हापूरकर इत्यादींच्या हस्ते गौरविण्यात आले. मिठ्ठू आंधळे हे मुळचे मु.रामनगर पो. तलवाडा ता. गेवराई जि. बीड आहेत ते सध्या रायगड विभागातील कर्जत आगारात वाहक पदावर कार्यरत आहेत.



मिठ्ठू त्रिंबक आंधळे यांनी हे हजारो अनाथ, वंचित, शाळाबाह्य गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी कार्य करत आहेत. आजपर्यंत त्यांनी ४० वेळेस रक्तदान केले आहे. तसेच यापूर्वीच त्यांनी मरणोत्तर नेत्रदान करण्याचा पण संकल्प केलेला आहे. आगारातील विविध उपक्रमामध्ये, जयंती उत्सव यामध्ये ते सदैव सक्रिय सहभागी असतात. एसटी प्रवाशांना सेवा देण्यासाठी तसेच अनेकानेक सामाजिक, शैक्षणिक उपक्रम राबविण्यात ते सदैव अग्रेसर असतात. गरीब विद्यार्थ्यांना बसचे पास, शालेय साहित्य वितरण करतात. त्यांना या पुरस्काराने सन्मानित केल्याबद्दल आगार प्रमुख देवानंद मोरे, स.वा.नि. महादेव पालवे, अशोक पालवे, दिपक देशमुख, संजय कोंडार, विलास बागुल, वसंत बागुल, मोहन घोटकर, संतोष फराट तसेच एसटी साहित्य रसिक समूहाच्या सर्वांनी शुभेच्छा दिल्या आहेत. राज्यभरातील अनेकांनी त्यांचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या आहेत.

# आता तरी प्रकाश आंबेडकरांना समजून घ्या या परिसंवाद मेळाव्यास प्रचंड संख्येने उपस्थित रहा : अजय सरवदे

बीड । प्रतिनिधी



महाराष्ट्राच्या राजकारणात २०१९ साली वंचित बहुजन आघाडी या पक्षाने उडी घेतली अन् प्रस्थापितांच्या उरात धडकी भरवत ४४ लाख मतदान लोकसभेला मिळविले विधानसभेला तो टक्का कमी कमी होत गेला याचे एकमेव मुख्य कारण म्हणजे काही स्वयंघोषित बुद्धिजीवी विचारवंत यांनी प्रस्थापितांच्या हाताला धरत त्यांच्याकडून गाड्या पैसे घेत वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांनी घेतलेले निर्णय भूमिका प्रयोग हे चुकीचे आहेत याचा अपप्रचार सुरू केला आणि मतदार दुरावत गेला.

वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांच्या संकल्पनेतून आता तरी प्रकाश आंबेडकरांना समजून घ्या या परिसंवाद मेळाव्याचे आयोजन केले असून फुले आंबेडकरी विद्वत सभेचे मा.भास्कर भोजने यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन होत आहे. या कार्यक्रमास वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय सदस्य महासचिव तथा जिल्हा प्रभारी प्रा. किसन चव्हाण, तक्रार निवारण समितीचे प्रमुख प्रा. विष्णू जाधव यांच्यासह आजी-माजी जिल्हा, तालुका, शहर पदाधिकारी, कार्यकर्ते निवृत्त कर्मचारी अधिकारी हे उपस्थित राहणार आहे.

बीड जिल्ह्यामध्ये राहणाऱ्या जनतेस वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी असे आवाहन केले आहे की परिसंवाद मेळाव्यास प्रचंड संख्येने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बीड येथे दिनांक ०८.०६.२०२५ रोजी ठीक १ वाजता उपस्थित राहावे असे प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# सामाजिक कार्यामध्ये अग्रेसर अशोक दादा ढोले पाटील यांची लोकशाही पत्रकार संघाच्या महाराष्ट्र राज्य बीड शहर उपाध्यक्षपदी निवड

बीड । प्रतिनिधी

समाजसेवा आणि सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर असलेल्या, बार्शी नाका परिसरातील अशोक दादा ढोले पाटील यांची लोकशाही पत्रकार संघाच्या महाराष्ट्र राज्य बीड शहर उपाध्यक्षपदी नुकतीच निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीने बीड शहरासह जिल्ह्यात सर्वत्र आनंदाचे व कौतुकाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दिनांक ६ जून २०२५ रोजी बीड जिल्हा शासकीय विश्रामगृह येथे पार पडलेल्या विशेष बैठकीत प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत ही निवड झाली. या प्रसंगी लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष बी.बी. वैद्य, राज्य सचिव सुनील दादा महाकुंडे, बीड जिल्हाध्यक्ष आत्माराम ओव्हाळ सर, पत्रकार शिवप्रसाद शिरसाट, महिला आघाडीच्या अध्यक्षा हिराबाई कांबळे ताई, शहर अध्यक्ष इमाद इमानदार, सय्यद सर, जिल्हा संघटक संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

अशोकदादा ढोलेपाटील हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक कार्यात कार्यरत असून गरजू, वंचित व दुर्लक्षित घटकांसाठी अनेक उपक्रम व मदतकार्य त्यांनी हाती घेतले आहे. त्यांच्या या सेवाभावी कार्याची दखल घेत त्यांची पत्रकार संघाच्या माध्यमातून अधिक जबाबदारीच्या पदावर निवड करण्यात आली आहे. या सोहळ्यात दुसरी महत्त्वाची निवड रामतीर्थ एमआयडीसी येथील दूनगव यांची उद्योग विकास समितीच्या कार्याध्यक्षपदी झाली असून त्यांच्याही कार्याचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे. अशोक दादा ढोलेपाटील यांच्या या निवडीमुळे पत्रकार संघाच्या माध्यमातून सामाजिक न्याय आणि सामान्य जनतेच्या प्रश्नांना प्रभावीपणे मांडण्याची भूमिका अधिक सक्षमपणे पार पाडली जाईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्या पुढील कार्यासाठी सर्वच स्तरातून त्यांना भरभरून शुभेच्छा दिल्या जात आहेत.



# बेरोजगारीवर मात करण्यासाठी तरुणांनी कौशल्य रोजगाराचे शिक्षण घेऊन उद्योजकतेकडे वळावे : आ.धस

आष्टी । प्रतिनिधी

तरुणांनी नोकरीपेक्षा कौशल्य रोजगार उद्योजकता विकास उपक्रमांचा अभ्यास करून व्यवसाय सुरू करावेत असे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले आष्टी येथील श्री गुरुलिंग स्वामी जिबकाटे शासकीय तंत्रनिकेतन येथे शिवराज्याभिषेक दिन साजरा करताना प्रमुख मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी रा.स्व. संघाचे जेष्ठ कार्यकर्ते श्रीधर सहस्त्रबुद्धे, रा.स्व. तालुका संघचालक कैलास रेडेकर प्राचार्य गणेश हडतगुणे उपस्थित होते या कार्यक्रमाचे ऑनलाईन उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते व्हिडीओद्वारे करण्यात आले. तसेच श्रीमती मनीषा वर्मा (अप्पर मुख्य सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग) यांनी कार्यक्रमाला शुभेच्छा संदेश पाठवून उपस्थितांचे उत्साहवर्धन केले.



आ.सुरेश धस पुढे म्हणाले, बेरोजगारीच्या समस्येवर कौशल्य शिक्षण हाच उपाय असल्याचा प्रभावी संदेश दिला. त्यांनी युवकांना व्यवसायाच्या दिशेने वाटचाल करण्याचे आवाहनही यावेळी केले. शिवराज्याभिषेक दिन फक्त साजरा न करता छत्रपती शिवाजी महाराजांच्या विविध गुण युवकांनी आपल्या अंगी उतरवावेत प्रामाणिकपणे शिक्षण घेऊन आपल्या आईवडिलांचे स्वप्न साकार करावेत सार्वजनिक संपत्तीचे व पर्यावरणाचे रक्षण करावे शिस्तबद्ध लष्कर व सुसंघटित प्रशासकीय यंत्रणेच्या बळावर छत्रपती शिवाजी महाराजांनी एक सामर्थ्यशाली व प्रागतिक राज्य उभे केले छत्रपती शिवाजी महाराजांनी आपली स्वत:ची अशी युद्धनीती विकसित केली जी गनिमी कावा म्हणून ओळखले जाते

कार्यक्रमात कुमारी शिवकन्या सौंदनकर हिने आपल्या ऑन-जॉब ट्रेनिंगचा अनुभव शेअर करत आपल्या भावना व्यक्त केल्या. श्री प्रबोधन निकाळजे यांनी सोशल मीडियापासून दूर राहून युवकांनी कौशल्य शिक्षणाकडे लक्ष देण्याचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी श्री श्रीधरपंत सहस्त्रबुद्धे यांनी शिवराज्याभिषेकाचा इतिहास सांगत त्याचा सण म्हणून महत्त्व विशद केले. त्यांच्या मनोगताच्या शेवटी त्यांनी स्वदेशी वस्तू वापरण्याचा प्रेरणादायी संदेश दिला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थितांनी तंत्र प्रदर्शनाला भेट देत प्रशिक्षणार्थ्यांनी तयार केलेल्या विविध प्रकल्पांचे कौतुक केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयटीआयचे प्राचार्य श्री गणेश हडतगुणे यांनी केले तर सूत्रसंचालन एम. जी. पवार सर यांनी प्रभावीपणे पार पाडले. या कार्यक्रमाला अनेक मान्यवर उपस्थित होते त्यामध्ये नगराध्यक्ष जिया बेग नगराध्यक्ष, माजी नगराध्यक्ष श्री रंगनाथ धोंडे, श्री अशोक जीबकाटे, ॲड. प्रबोधन निकाळजे, श्री अक्षय शिरस्वाल, श्री कैलास रेडेकर, श्री गणेश शिंदे, श्री गौतम आजबे, श्री विनोद रोडे, श्री सुनिल सानप, श्री नितेश कर्डुले, सर्व शिक्षकवृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शासकीय इमारतींसाठी जागा उपलब्धतेबाबत आढावा बैठक

## घरकुल लाभार्थ्यांना मिळणार मोफत ५ ब्रास वाळू



माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव, धारूर आणि वडवणी तालुक्यांमध्ये नव्याने उभारण्यात येणाऱ्या शासकीय इमारतींसाठी आवश्यक जागा उपलब्धतेबाबत काल आढावा बैठक पार पडली. यामध्ये खालीलप्रमाणे प्रस्तावांवर चर्चा करण्यात आली. माजलगाव प्रशासकीय इमारत - जलसंपदा विभागाच्या केसापुरी कॅम्प येथील जागा महसूल विभागाकडे वर्ग करून घेण्याबाबत कार्यवाही करण्यात आली आहे. माजलगाव येथे २५० विद्यार्थ्यांची क्षमता असलेले मागासवर्गीय मुलांचे वस्तीगृह. ऊसतोड कामगार मुलांचे व मुलींचे स्वतंत्र वस्तीगृह. धारूर येथे, ऊसतोड कामगार मुलांचे व मुलींचे स्वतंत्र वस्तीगृह. वडवणी येथे ऊसतोड कामगार मुलांचे व मुलींचे स्वतंत्र वस्तीगृह. शासकीय मागासवर्गीय मुलींसाठी वस्तीगृह तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय व कृषी उत्पन्न बाजार समितीची इमारत यासंबंधी सर्व संबंधित विभागांनी तात्काळ जागेचे सर्वेक्षण करून १५ जून २०२५ पर्यंत प्रस्ताव शासनाकडे सादर करावेत, अशा सूचना बैठकीदरम्यान देण्यात आल्या. आगामी पावसाळी अधिवेशनात या सर्व प्रस्तावांसाठी पुरवणी मागणी सादर करण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. जनतेच्या मूलभूत सुविधांसाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा आमचा कटिबद्ध प्रयत्न सुरूच राहणार अशी माहिती आमदार प्रकाश सोळंके यांनी दिली.

### घरकुल लाभार्थ्यांना मिळणार मोफत ५ ब्रास वाळू!

नवीन वाळू धोरणानुसार, राज्य शासनाने घरकुल बांधणाऱ्या लाभार्थ्यांना ५ ब्रास वाळू मोफत देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयास अधिकृत शासन निर्णयाची (ऋठ) अधिसूचना मिळाल्यानंतर, माजलगाव तालुक्यातील ७० ते ८० लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात मोफत वाळू पासचे वितरण करण्यात आले. या उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी आपले ग्रामसेवक, तलाठी, गटविकास अधिकारी किंवा पंचायत समिती कार्यालयाशी संपर्क साधावा.



पोलिस स्टेशन पेठ बीड पोलिस निरीक्षक अशोक मुदिराज, प्रीतमकुमार पुजारी, नितीश माने, चालक इम्रान सय्यद यांना मिळालेल्या गोपनीय माहिती वरून १७ गोवंशीय प्राण्यांना कत्तल करणे चे उद्देशाने मोहम्मदिया कॉलनी जवळ प्लॉट वर दोरीने बाधून ठेवलेले गोवंश मिळून आले. त्या ठिकाणी छापा टाकून सर्व गोवंश ताब्यात घेतले. आरोपी गणी बबलू कुरेशी कुरेशी मोहल्ला व इतर दोन अनोळखी घटना ठिकाणावरून पळून गेले. एकूण १७ गोवंश किंमत २५००००/- दोन लाख पन्नास हजार रुपये चे ताब्यात घेऊन पुढील कार्यवाही करीत आहे. सदर कार्यवाही मा.पोलिस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलिस अधिकारी श्री मीना साहेब यांचे मार्गदर्शन खाली करण्यात आली आहे.

# धारुर नगर परिषदेच्या कचराविलेगीकरण कक्षाला कुलूप

## कचरा विलगीकरण होत नसल्याने कचऱ्याचे साचले ढीग; रोगराई पसरण्याची दाट शक्यता

धारूर । प्रतिनिधी

धारूर नगर परिषदेच्या वतीने मागील काळात कचरा विलगीकरण करण्यासाठी लाखो रुपये खर्च करून यंत्र बसवण्यात आले आहे. मात्र नगर परिषदेच्या आनि विशेष प्रशासक काळात दुर्लक्षामुळे हे यत्र बंद अवस्थेत पडून आहे. यामुळे कचरा विलगीकरणाचा बोजवारा उडाला आहे. कचरा विलगीकरण कक्षाला कुलूप ठोकलेली असून मशीन बंद अवस्थेत आहे. यामुळे कचऱ्याचे मोठमोठे ढीग साचलेले असून या परिसरात मोठ्या प्रमाणावर वाऱ्याने कचरा पसरल्याचे दिसून येते तसेच कचरा अनेक दिवसापासून विलगीकरण झाला नसल्याने आहे त्या जागी कुजत असल्याने पर्यावरण दूषित होऊन परीसरात मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी पसरली आहे मात्र नगरपरिषद प्रशासन या गंभीर बाबीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे.




धारूर नगर परिषदेच्या वतीने मागिल काळात शहरातील गोळा केलेला कचरा विलगीकरण करण्यासाठी लाखो रुपये खर्च करून कचरा विलगीकरण करण्याचे आधुनिक यंत्र बसवण्यात आले होते या यंत्राच्या माध्यमातून बसवल्यापासून काही दिवस कचरा विलगीकरणाचे काम चांगल्या पद्धतीने सुरू होते मात्र नगर परिषदेवर प्रशासक राज सुरू झाल्यापासून स्वच्छतेवर पैसा तर खर्च होतो मात्र स्वच्छता होत नसल्याचे धारूर शहरातील घाणीच्या साम्राज्याहून दिसून येतेच वरून जो काही थोड्या प्रमाणात कचरा गोळा करून घन कचरा व्यवस्थापन केंद्र या ठिकाणी टाकण्यात येतो आणि त्या ठिकाणी टाकलेला कचरा विलगीकरण करण्यासाठी यंत्राचा वापर होणे गरजेचे आहे मात्र कचरा विलगीकरण यंत्र असून केवळ त्या यंत्राचा वापर करन्यात येत नाहि कचरा वर्गीकरण अत्यंत महत्त्वाचे आहे कारण काही प्रकारचे कचरा धोकादायक असू शकतात आणि योग्यरित्या व्यवस्थापित न केल्यास ते पर्यावरणाला दूषित करू शकतात. (यापैकी काही प्रकारच्या कचऱ्यामुळे रोग होऊ शकतात किंवा पाण्याच्या पुरवठ्यात प्रवेश करू शकतात किंवा वेगवेगळ्या प्रकारच्या लीचेट्सने जमीन दूषित करू शकतात. असे असताना मागील काळात हे कचरा विलगीकरण यंत्र बंद ठेवण्यात आलेले आहे. त्यामुळे कचरा डेपोच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर कचऱ्याचे ढीग लागलेले आहेत.

यामुळे या भागात मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी पसरलेली असते याचा या भागात असलेल्या न्यायालय, वस्तीग्रहे, आयटीआय कॉलेज तसेच फॉरेस्ट कार्यालय अधिकाऱ्याला याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे तसेच याच मार्गाने आंबा चोंडी देवीच्या दर्शनासाठी जाणाऱ्या भक्तांना देखील कचरा डेपो निघणाऱ्या दुर्गंधीचा मोठा त्रास सहन करावा लागला आहे असे असताना मात्र नगर परीषद प्रशासनाने कचराविलेगीकरण कक्षाला कुलूप लाऊन ठेवलेले असल्याने नगरपरिषद प्रशासनाच्या कामकाजा अनेकवर प्रश्न निर्माण होत आहेत.

# वडवणी येथे स्थानिक गुन्हे शाखेचा गुटखा गोडाऊनवर छापा

## चार लाख एकोनपन्नास तीनशे रुपयाचा गुटखा जप्त

बीड । प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक, बीड यांनी अवैध धंद्याविरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत त्यावरुन पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड स्था.गु.शा.बीडयांनी अवैध धंद्याचेसमुळ उच्चाटन करण्यासाठी अवैध धंद्ये करणारांची गोपनिय माहिती काढुन कारवाई करण्यासाठी स्थागुशा पथकांना सुचना दिलेल्या आहेत.



त्यावरुन दिनांक ०६/०६/२०२५ रोजी स्थागुशा बीड येथील पोउपनि महेश विघ्ने हे वरिष्ठांचे आदेशान्वये पोलीस ठाणे वडवणी हद्दीमध्ये अवैध धंद्याची माहिती काढत असतांना गुप्त बातमी मिळाली की, ईसम नामे अरविंद सुग्रिव म्हस्के हा त्याने किरायाने घेतलेल्या आनंद किराणा स्टोअर्स दुकानात मोठ्या प्रमाणात अवैद्यरित्या गुटख्याची साठवणुक करुन ठेवला आहे. यावरुन सदर ठिकाणी दोन पंचाना पाचारण करुन पोलीस स्टाफसह पोलीस उपनिरीक्षक विघ्ने यांचे टीम ने वसंतराव चौकातील आनंद किराणा स्टोअर्स् वर अचानक छापा टाकला असता ईसम नामे अरविंद सुग्रिव म्हस्के हा दुकानात हजर मिळुन आला. त्याचे दुकानाच्या झडतीमध्ये त्याने स्वत:चे फायद्यासाठी महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत केलेला गुटखा, सुगंधीत स्वादिष्ठ पान मसाला, तंबाखु व तंबाखुजन्य पदार्थ वर बंदी असतांना देखील विनापरवाना, बेकायदेशीररित्या दुकानामध्ये गुटखा, पान मसाला, तंबाखु जन्य पदार्थाचा एकुण ४,४९,३००/- रु चा मुद्देमाल बाळगतांना मिळुन आल्याने सदर मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. आरोपीस पोलीस स्टेशन वडवणी येथे हजर करुन त्याचे विरुध्द पोउपनि महेश विघ्ने स्थागुशा,बीडयांनी सरकार तर्फे फिर्याद देवुन गु.र.नं १५५/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम १२३,२२३,२७४,२७५ अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

सदरची कामगिरी नवनित काँवत पोलीस अधीक्षक, बीड, सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड, पोनि शिवाजी बंटेवाड स्था.गु.शा.बीडयांचेमार्गदर्शनाखाली पोउपनि महेश विघ्ने, पोह/ राजु पठाण, महेश जोगदंड, राहुल शिंदे, पो अं /बप्पासाहेब घोडके, अर्जुन यादव, चालक गणेश माराडे यांनी मिळुन केलेली आहे.



महाराष्ट्र आधार सेनेच्या वतीने वडवणी पोलिस स्टेशन येथे नव्याने रुजू झालेल्या वर्षा शिंदे व्हागाडे मॅडम यांचा सत्कार करुन सामाजिक विषायावर चर्चा केली व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी युवा नेते अनिल आव्हाड, बाबू हातागळे, सतीश हनवते, उमेश आव्हाड, करण सरवदे, अर्जुन सरवदे, महाराष्ट्र आधार सेना वडवणी चे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

# प्रदीप मिश्रा महाराज यांच्या शिवपुराण कथेसाठी ६० जादा बसेस उपलब्ध

## भाविकांनी एसटी बस सेवेचा लाभ घ्यावा : नितेश उपाध्ये



बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे विसाव्या शतकातील महान संत माऊली महाराज (चाकरवाडीकर) यांच्या पंचविसाव्या पुण्यतिथी निमित्त रोप्य महोत्सवाचे आयोजित करण्यात आला असून परमपूज्य पंडित श्री प्रदीप मिश्रा महाराज यांच्या शिवपुराण कथेसाठी मोठ्या प्रमाणावर भक्तगण दाखल होत आहेत. भक्तांच्या गर्दीचा आणि सोयी-सुविधांचा विचार करून बीड जिल्हा परिवहन विभागाने ज्यादा बसेस सोडण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

या कथेसाठी जिल्ह्यातील सर्व आगारामार्फत अतिरिक्त ६० बसेस उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. बीड विभाग नियंत्रकांच्या आदेशानुसार, भक्तांना त्यांच्या गावी सहजपणे पोहोचता यावे आणि परतीचा प्रवासही आरामदायक व्हावा, यासाठी जादा बसेस विविध मार्गांवर चालवल्या जाणार आहेत. कथेमध्ये येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये, गर्दी नियंत्रणात राहावी आणि वाहतूक सुरळीत पार पडावी, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.



शिवपुराण कथा ८ जून ते १४ जून आठवडाभर चालणार असून दररोज लाखो भक्त सहभागी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे स्थानिक प्रशासन, वाहतूक विभाग आणि स्वयंसेवक मंडळ यांच्यामार्फत नियोजनबद्ध वाहतूक व सुविधा दिल्या जाणार आहेत. भक्तांनी सार्वजनिक वाहतुकीचा म्हणजेच रा.प. बस सेवेद्वारे प्रवास करण्याचे आवाहन विभाग नियंत्रक अनुजा दुसाने यांनी केले आहे.

**जिल्ह्यातील ज्यादा बसेसची माहिती**

बीड १०, धारूर १०, माजलगाव ५, परळी ५, गेवराई ५, पाटोदा १०, आष्टी ५, अंबाजोगाई १० अशा एकूण ६० जादा बसेसची व्यवस्था एसटी महामंडळाकडून करण्यात आली आहे.

**यात्रा शेडची व्यवस्था**

जिल्हाभरातून येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी राज्य परिवहन महामंडळाकडून यात्रा शेडची व्यवस्था चाकरवाडी फाटा ते नेकनूर दरम्यान मुख्य रस्त्याच्या बाजूला एचपी पेट्रोल पंप जवळ करण्यात आली आहे.

**भाविकांनी एसटी बससेवेचा लाभ घ्यावा - नितेश उपाध्ये**

बीड जिल्ह्यातील सर्व बस स्थानकातून चाकरवाडी येथे आयोजित पंडित प्रदीपजी मिश्रा महाराज यांच्या शिवपुराण कथेसाठी लाखो भाविक येण्याच्या दृष्टीने राज्य परिवहन महामंडळ बीड यांनी मागणीप्रमाणे ६० जादा बसेसची सुविधा उपलब्ध करून दिली आहे याचा लाभ भाविकांनी घ्यावा असे आव्हान नितेश उपाध्ये यांनी केले आहे.



हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT